HGH INDIA® 2021
HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE
November 30 - December 3, 2021,
INDIA EXPO CENTRE, GREATER NOIDA, DELHI NCR
10 Inspiring Business for 10 years
NEWS 3
A TEXZONE Event
www.hghindia.com

जिथे व्यवसायाला वाटते 'होम'!

## वसंत /उन्हाळा २०२२

# व्यवसायाचा नवाकोरा मोसम परतला

मागील दोन वर्षांत महासाथीने व्यवसायांवर मोठा परिणाम केला. आता १० व्यांदा होम प्रॉडक्ट व्यापार नाविन्यपूर्णता आणि नवीन स्त्रोतांकरिता सज्ज होतो आहे. एचजीएच इंडिया २०२१ मध्ये नव्याने प्रवेश घेणारे घटक वैविध्यपूर्ण, यापूर्वी न पाहिलेली होम प्रॉडक्ट देऊ करणार आहेत. अनेक सुस्थापित ब्रँड्स आणि एचजीएच इंडिया २०२१ मध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रदर्शकांनी त्यांच्या सध्याच्या व्यवसायात नवीन उत्पादनांची भर घातल्याने त्यांच्या व्यवसायाचा रुबाब वाढला. सर्व व्यावसायिक अभिनव, सर्वोच्च क्षमतेच्या व्यवसाय संधी उपलब्ध करून देत आहेत. याठिकाणी विक्रेते, वितरक, पुरवठादार, इंटीरियर डिझायनर, वास्तुविशारद आणि संस्थात्मक खरेदीदारांना आगामी वसंत/ उन्हाळी हंगामाकरिता नाविन्यपूर्ण स्त्रोत पर्याय उपलब्ध झाले आहेत.

एचजीएच इंडिया २०२१ हे प्रदर्शन **इंडिया एक्स्पो सेंटर, ग्रेटर नॉयडा, दिल्ली एनसीआर** येथे भरणार असून **३० नोव्हेंबर – ३ डिसेंबर २०२१** कालावधी नजीक येऊन ठेपला आहे. या प्रदर्शनात होम टेक्सटाईल, होम डेकोर, स्मॉल फर्निचर, हाऊसवेअर आणि भेटवस्तू पर्यायांत संधीला प्रतिसाद देत अधिकाधिक व्यावसायिक प्रवेश करत आहेत. सरकारच्या वतीने देशभरात लसीकरणाची मोहीम मोठ्या वेगाने हातात घेतल्याने ११२ कोटींहून अधिक डोसचे लक्ष्य पूर्ण झाले. आता कोविडच्या तिसऱ्या लाटेची भीती कमी-अधिक प्रमाणात असली, तरीही दिवाळी-पश्चात कोविड प्रकरण आटोक्यात आल्याचे दिसते. बहुतांशी प्रवासी निर्बंध उठविण्यात आले आहेत, व्यापार आणि उद्योगांची प्रवासी भीती चेपली आहे. खरेदीदार आणि विक्रेते यांना खबरदारी बाळगत व्यवसाय पूर्वपदावर यावेत असे वाटते. भारतात ग्राहक मागणी वाढावी अशी दोन्ही पक्षांची इच्छा आहे. दिवाळीचा विक्री मोसम अतिशय यशस्वी ठरल्याने व्यवसाय करण्याच्या मूडमध्ये अधिकच सकारात्मकता आली आहे. दिवाळी नंतरही उत्साह टिकून असलेला पहायला मिळतो.

एचजीएच इंडियाने विस्तृत व्यवस्था केल्या असून प्रदर्शक आणि भेट देणारे तसेच कर्मचारी वर्गाच्या दृष्टीने सुरक्षा, आरोग्य आणि स्वच्छतेची सर्व खातरजमा केली आहे. सरकारच्या वतीने जारी करण्यात आलेले सोशल डिस्टंसिंग नियम आणि सुरक्षेची मार्गदर्शक तत्त्वे काटेकोरपणे पाळली जात आहेत.

आम्ही इथे नमूद करू इच्छितो की, आम्ही तुमच्याकरिता एचजीएच इंडिया २०२१ मध्ये सहभागी होणारे प्रमुख प्रदर्शक, त्यांच्याद्वारे सादर करण्यात येणाऱ्या निरनिराळ्या सेगमेंटचा आढावा घेऊन आलो आहोत. ज्यामुळे इथे येताना त्यानुसार नियोजन करणे शक्य होईल.


Indo Count

### होम टेक्स्टाईल, अजूनही वृद्धी सुरूच

भारतीय होम प्रोडक्ट बाजारपेठेत होम टेक्सटाईल हे सर्वात मोठे आणि सुस्थापित सेगमेंट असून संपूर्ण होम प्रोडक्ट विक्रीतील ५०% हिस्सा राखून आहे. आणि आजही शहरी तसेच ग्रामीण बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर वृद्धी क्षमता कायम आहे. आगामी १०० स्मार्ट सिटी त्याचप्रमाणे टियर II आणि टियर III शहरांमध्ये खूप उत्तम संधी असल्याने ग्राहक आणि विक्री हिस्स्यात वाढ होताना दिसते. एचजीएच इंडिया २०२१ मध्ये होम टेक्सटाईल पलंग आणि अंघोळीशी संबंधित कापड, फर्निचरला लागणारे कापड, सजावटीच्या वस्तू, खिडकीची सजावट, सूर्यप्रकाशापासून संरक्षण, गाद्या आणि झोपेशी संबंधित उत्पादने, टेबल आणि स्वयंपाकघरात लागणारे कापड, गालिचे आणि फ्लोअर कव्हरिंग इत्यादी उपलब्ध असेल. या प्रकारात व्यापारी आणि ग्राहकांत लोकप्रिय असलेले काही ब्रँड्सदेखील आहेत. एचजीएच इंडिया २०२१ मध्ये अनेक नियमित आणि नवीन प्रदर्शक आपल्याकडील नवीन उत्पादन श्रेणीचे सादरीकरण करण्यासाठी इथे स्वत:ची ओळख देत, व्यवसायाचा विकास आणि विस्तार करत आहेत. भारतीय बाजारपेठांमध्ये त्यांच्या कंपन्यांना होम डेकोर आणि होम टेक्सटाईलची समर्पक उत्पादने उपलब्ध करून देतील.

एचजीएच इंडिया २०२१च्या होम टेक्सटाईल विभागाला भेट देणारे काही अतिशय ताज्या व्यावसायिक कल्पना आणि संधींची अपेक्षा ठेवू शकतात. या विभागात एशियन पेंट्स, कर्ल-ऑन, किंग कॉइल, पेप्स, शारधा टेरी अँड पॅन ओव्हरसीज अग्रगण्य नावे भेटीला येणार आहेत. नियमित प्रदर्शक आणि त्यांचे वर्गवारीतील नेतत्व जसे की मासपार, बुटीक लिव्हिंग अँड लेयर्स (इंडो काउंट), डीसीटेक्स, सारोम, जे अँड व्हाय फेब्रिक्स (इंडियन ड्रेप), न्यू कासल (देवा टेक्सटाईल्स) हे होम मोसमात वसंत/ उन्हाळी मोसमातील डिझाईन आणि कलेक्शन घेऊन येणार आहेत.

मासपार हे एचजीएच इंडियाच्या २०१२ स्थापनेपासूनचे नियमित प्रदर्शक असून या नामांकीत होम टेक्सटाईल ब्रँडला एचजीएच इंडियात केवळ स्वत:ची उत्पादने विकण्याची संधी मिळाली नाही तर त्यांचे विक्री जाळे संपूर्ण भारतात पसरविता आले. मासपार 'च्या वतीने होम टेक्स्टाइलची मोठी उत्पादन श्रेणी अगदी सजावटीच्या वस्तू ते अंघोळीशी संबंधित साहित्य म्हणजे बाथ मॅट, ब्लँकेट, किचन आणि टेबल लिनन, गिफ्ट सेट, कार्पेट, एरिया रग्ज, खासगी आणि व्यावसायिक गिफ्ट सेट आणि तत्सम उपलब्ध करून देण्यात येईल. मासपारच्या उत्पादनांत रंगांचे पर्यायही उपलब्ध असतील. घरातील अंतर्गत सजावटीला बहार आणणाऱ्या सजावटीच्या वस्तू, पलंगावरील चादरी, चटया इत्यादींचा त्यात समावेश असेल. रंगांचे पर्याय आणि उत्पादनांची सर्वोत्तम गुणवत्तेमुळे उत्पादनांची विक्री प्रभावीपणे होऊ शकणार आहे.

### घरगुती सजावटीला लागणारे फेब्रिक

सजावटीला लागणारे कापड, उशांची अभ्रे आणि पडदे यांची बाजारपेठ अतिशय स्पर्धात्मक आहे. घरात नवनवीन वस्तूंचा उपयोग करण्याकडे कल वाढला आहे. तसेच घरांची संख्याही दिवसेंदिवस वाढते आहे. एचजीएच इंडिया २०२१ मध्ये नाविन्यपूर्णतेचा सातत्याने अनुभव होत असतो. याठिकाणी डीसीटेक्स फर्निशिंग, जे अँड व्हाय (इंडियन ड्रेप), सारोम, न्यू कासल, मायक्रोफायबर्स, लक्झर अशा लोकप्रिय ब्रँड्सचा समावेश असेल.


Aartex

हे सेगमेंट अजूनही असमान आहे. इथे ब्रँड बिल्डींग आणि संयोगाला बराच अवकाश उरतो. त्यामुळे अनेक नवोदित जसे की, **एशियन पेंट्स** त्याचप्रमाणे मुंबई, दिल्ली, पानिपत, सुरत, अहमदाबाद, जयपूर, बेंगळूरूच्या लहान आणि मध्यम आकाराच्या कंपन्यांसमवेत सुस्थापित आयातदार उत्साह आणि नवीन कल्पना रुजवतील. संपूर्ण देशातील होम टेक्सटाईल, होम डेकोर अँड फर्निशिंग विक्रेत्यांनी हजारोंच्या संख्येने पूर्व-नोंदणी केली आहे. सध्याचे आणि नवीन पुरवठादार नवीन उत्पादने तसेच व्यावसायिक कल्पनांचा शोध घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

नाविन्यपूर्णता ▪ ट्रेंड्स ▪ उत्पादने ▪ स्त्रोत ▪ संधी

# होम टेक्सटाईल, होम डेकोर, हाऊसवेअर आणि भेटवस्तू यांचे विहंगावलोकन

**डीसीटेक्स,** हा फर्निशिंग फॅब्रिक तसेच होम टेक्सटाईलमधील एक अतिशय प्रसिद्ध ब्रॅंड आणि निर्माता असून उच्च गुणवत्ता आणि आलिशान फर्निशिंग, ज्यामध्ये वेलवेट, चेनील्ले, दमास्कस, कशिदाकारी आणि साधे पडदे, सजावट तसेच आणखी बऱ्याच गोष्टींचा समावेश असतो. या उत्पादन गटात बरीच मोठी उत्पादन श्रेणी असल्याने खरेदीदारांना पसंतीची खरेदी करण्याची संधी मिळते. त्यांचा लक्षकेन्द्री ग्राहक वर्ग अतिशय निराळा असून वेगवेगळ्या इंटिरिअर डिझाईन स्टाईल्स उपलब्ध आहेत.

**इंडियन ड्रेप** हा आपला ब्रॅंड **जेअँडव्हाय** फेब्रिक्स समवेत ट्रान्सफर प्रिंटेड फॅब्रिक, वेलवेट, फ्लॅट आणि टेक्स्चर फेब्रिकमधील बाजारातील नेतृत्व गाजवतो. ते शिलाई कापड आणि पडद्यात अष्टपैलूत्व सिद्ध करत कट लेंथ सर्विस उपलब्ध करून देतात. ज्या माध्यमातून त्यांची ग्राहकांना सेवा देण्याची महत्त्वाकांक्षा दिसते. व्यवस्थापकीय संचालक जयेश दवे सांगतात की, एचजीएच इंडिया २०२१ मधून उत्तर भारताच्या बाजारपेठेत, दिवाळी पश्चात नवीन उदयोन्मुख खरेदी मोसमात नवीन व्यवसाय संधीचा शोध घेण्यात त्यांना मदत मिळणार आहे.

**सारोम,** हा फर्निशिंग ब्रॅंड आपले साहित्य आणि डिझाईनकरिता अभिनव वैशिष्ट्य जपत देशी आणि परदेशी श्रेणीचा संयोग साधत ड्रेपरी, शिलाई, लेदरेट आणि सजावटीच्या कापडात ताज्या कल्पना आणतो आहे.

**भिक्षू फॅब्रिक्स,** रेडीमेड पडद्यांची आगामी उत्पादन वर्गवारी सादर करेल. ज्यामध्ये ब्लॅकआऊट, पॉलियस्टर वेलवेट, शियर्स आणि पॉली कॅनव्हास असे विविध प्रकार असतील. भिक्षूच्या वतीने महत्त्वाच्या व्यवसायाचे दर्शन घडवण्यात आले असून त्यांनी स्थानिक बाजारपेठेत पडदे, सोफे, उशांचे अभ्रे, चादरी आणि सजावटीचे अन्य टेक्सटाईल साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

त्याशिवाय, एचजीएच इंडियाला भेट देणाऱ्यांना **आर्टेक्स, असादीप, फॅब्रिक किंग्ज, इंडिगो इंडस्ट्रीज, लक्झर इम्पेक्स, सुजाता** आणि अशा अनेक ब्रॅंड्सच्या नवीन डिझाइन आणि उत्पादन कल्पना पाहता येतील.

## बेड अँड बाथ टेक्सटाईल्स

दरवर्षी भारतात घरांची संख्या वाढत चालली आहे, या सेगमेंटची मागणी सतत वाढत असून भारतीय होम टेक्सटाईल्स बाजारपेठेत हा सेगमेंट सर्वात मोठा आणि जुना मनाला जातो. पलंगावर आणि न्हाणीघरात वापरता येणारे टेक्सटाईल साहित्य नियमित उपयोगात असणारे, स्वच्छ आणि त्वचेला आनंददायक असले पाहिजे, शिवाय त्यामुळे तुमचे बेडरूम आणि बाथरूमची शोभा वाढली पाहिजे. एचजीएच इंडिया २०२१ या सेगमेंटमध्ये सुस्थापित तसेच नवीन प्रवेश करणाऱ्यांकडून अतिशय रोचक श्रेणी उपलब्ध करून देणार आहे.

**इंडो काउंट** हा चादरी तसेच बेडिंगचा भारतातील सर्वात मोठा निर्यातदार असून भारतीय स्थानिक बाजारपेठेत एंड-टू-एंड बेडिंग


Indo Count

पर्यायांचा अग्रगण्य पुरवठादार मानला जातो. एचजीएच इंडिया २०२१ मध्ये त्यांचे ब्रॅंड्स बुटीक लिव्हिंग अँड लेयर्सचे स्वतंत्र लक्ष्य झोपेच्या बहुआयामी अनुभवाकडे राहील. त्यांच्या फॅशन बेडिंग कलेक्शनमध्ये शोभणारे आणि समकालीन शिट्स, कम्फर्टर, ड्युएट कव्हर्स, क्विल्ट, उशा, शॅम्ज, स्कर्ट्सचा समावेश राहील. युटीलिटी बेडिंग सेक्शनमध्ये मॅट्रेस पॅड्स, डाऊन अल्ट कम्फर्टर, फिल्ड पिलोज आणि प्रोटेक्टर्सचा समावेश असेल. इंडो काउंट व्हर्टीकली इंटीग्रेटेड असून निर्मिती आणि अंतर्गत सेवा प्रक्रियेची प्रत्येक पायरीचे व्यवस्थापन करण्यात आले आहे. याद्वारे केवळ रिटेल पर्याय देण्यात येत नसून हॉटेलसारख्या संस्थात्मक ग्राहकांना सेवा पुरविण्यात येते.

कृष्णा कोटेक्स टेक्सटाईल डीसान ग्रुपशी संबंधित आहे व त्यांनी बोनहेयुर ब्रॅंड लॉन्च केला, हा भारत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उच्च गुणवत्तेचे टेरी टॉवेल उपलब्ध करून देतो. एचजीएच इंडियात त्यांच्या डिस्प्ले प्रोडक्टमध्ये टेरी टॉवेल, बाथ रोब्ज आणि स्लिपर्स, फ्लॅट टॉवेल, बीच टॉवेल, किड टॉवेल, फेस टॉवेल, गिफ्ट सेट्सचा समावेश असतो.

शारधा टेरी प्रोडक्ट्स, हा भारताचा कोइम्बतूरमधील अग्रगण्य निर्यातदार असून जगात उच्च गुणवत्तापूर्ण लक्झरी टॉवेल ब्रॅंड मायक्रोकॉटनकरिता ओळखला जातो. या वर्गवारीत पहिल्यांदाच नाविन्यपूर्ण पर्यायांची संपूर्ण श्रेणी सादर करण्यात आली असून बेड अँड बाथ सेगमेंटमध्ये विक्रेते तसेच वितरकांकरिता संपूर्णपणे नवीन व्यवसाय संधी आणण्यात येईल.

पॅन ओव्हरसीज, हा पानिपतमधील उच्च गुणवत्तापूर्ण बाथ मॅटमधील सर्वात मोठा निर्यातदार आहे, ज्याने बाथ मॅट, बाथ रग्ज आणि लाईफस्टाइल व सजावटीच्या संपूर्ण उत्पादन श्रेणीसह ब्रॅंड पॅनो लॉन्च केला आहे. त्यांची उत्पादने डेकोर आणि कार्यक्षमतेला साजेशी अभिनव डिझाईन वैशिष्टे घेऊन येतात.

## मॅट्रेस आणि स्लिप टेक्नॉलॉजी

भारतीय ग्राहक वर्ग झपाट्याने आरोग्यपूर्ण जीवनाचा भाग असलेल्या झोपेची गुणवत्तेबाबत, तंदुरुस्ती आणि चपळता राखण्याविषयी झपाट्याने सजग होतो आहे. चांगल्या आणि आरोग्यपूर्ण झोपेला अनेक पदर आणि निरनिराळे टप्पे असतात. झोपेचा दर्जा चांगल्या मर्यादेपर्यंत उत्तम राखण्यासाठी प्रत्येक व्यक्तिकडून वापरली जाणारी योग्य प्रकारची झोपेशी निगडीत उत्पादने महत्त्वाची ठरतात.


Kurlon

अन्य टेक्सटाईल क्षेत्रांसह जिथे सजावटीच्या दृष्टिकोनातून डिझाईन पॅटर्न आणि रंग महत्त्वाचे असतात, आरोग्यदायक झोपेला टेक्सटाईल साह्यकारी ठरते. हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि झोपेशी निगडीत उत्पादन साहित्यावर आधारित असते. एकीकडे जगात स्लिप कोच आणि स्लिप क्लिनिक तसेच स्टुडिओ सुरु होत आहेत. गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीतून झोपेच्या बहुढंगी पैलूंचे विश्लेषण करण्यात येते आहे. त्यामुळे तंत्रज्ञान आणि साहित्य नाविन्यपूर्णता यांचा आरोग्यदायक झोपेत झटपट मेळ बसतो. झोपेशी निगडीत व्यवसाय आणि बेड्स, मॅट्रेस आणि त्यापलीकडील आकर्षक फरकाच्या आधारे हे वृद्धी क्षेत्र आकलून घेतले पाहिजे.

एचजीएच इंडिया 2021 मध्ये, हॉल १४ मध्ये **वर्ल्ड ऑफ स्लिप** ब्रॅंड अंतर्गत विशेष स्लिप टेक्नॉलॉजी पव्हेलियन असणार आहे, जिथे विक्रेत्यांना स्लिप प्रोडक्टमध्ये झालेली प्रगती समजून घेण्याची संधी मिळेल. **वर्ल्ड ऑफ स्लिप** हा **एचजीएच इंडिया** आणि **आयएसपीएफ (इंडियन स्लिप प्रोडक्ट्स फेडरेशन)** चा संयुक्त उपक्रम आहे. आरोग्यपूर्ण झोपेकरिता बेडची पद्धत सोबत मॅट्रेस महत्त्वाचे उत्पादन ठरावे. स्लिप टेक्नॉलॉजी झोनमध्ये **कर्ल ऑन, स्लिपवेल, किंग कॉईल, पेप्स, नीलकमल** यांसारखे अग्रगण्य ब्रॅंड त्यांची कॉईर, स्प्रिंग, मेमरी फोम, रबर फोम आणि थेरपटीक मॅट्रेस प्रोटेक्टर्समधील नाविन्यपूर्ण उत्पादन श्रेणीचे अनावरण करतील.

फ्रेश अप, होम स्कॅपेस, स्पाईनमॅट, कम्फी यांसारख्या काही आगामी काळातील ब्रॅंड व्यतिरिक्त अनेक इतर ब्रॅंड या सेगमेंटमधील व्यापारात विविधांगी पसंतीचे पैलू आणि नवीन व्यवसाय संधी घेऊन येत आहेत.

## हाऊसवेअर: स्मार्ट, अधिक आधुनिक

भारतामधील हाऊसवेअर बाजारपेठ वाढते आहे, त्यात वैविध्य येते आहे आणि वर्षागणिक लक्षणीय अद्ययावत होते आहे, किचनवेअर, कुकवेअर, किचन उपकरण, टेबलवेअर, साठवणुकीची भांडी, आरोग्य आणि स्वच्छता तसेच सर्वसाधारण हाऊसवेअर उत्पादनांचे वैविध्य, गुणवत्ता आणि उत्पादन मागणीत वाढ झाली. स्वयंपाक घरातील आणि जेवायला


Signoraware

बसण्याच्या पद्धतीत बदल झाले. पारंपरिक पद्धत जाऊन आधुनिकीकरण आले. स्वयंपाकाचे सर्वच काम आता एकहाती होऊ लागले आहे. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापरही सर्रास होताना दिसतो. पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात हाऊसवेअरचा उपयोग वाढला आहे. स्वयंपाक घरातील उपकरणांत अधिक बदल होऊन ती प्रगत झाली, आधुनिक पद्धतीची क्रॉकरी आणि डिनर सेट यांच्या येण्याने नवीन व्यवसाय संधी आल्या आणि बाजारात नवीन स्थिती प्राप्त झाली.

## कुकवेअर

भारतीय स्वयंपाक पद्धतीने अधिकाधिक शहरी आणि आंतरराष्ट्रीय स्वयंपाक पद्धतींचा अवलंब केला आहे. त्यात आरोग्य विषयक सजगता, सुलभता आणि होम फॅशन ट्रेंड्सनी चालना दिली. भारतीय ग्राहक वर्गात आंतरराष्ट्रीय मानके असलेले प्रेशर कुकर, फ्राइंग पॅन आणि कुकवेअरच्या विस्तृत श्रेणीतील ब्रॅंडेड उत्पादनांना मागणी वाढलेली दिसते. विक्रेत्यांनी नवीन कुकवेअर उत्पादनांकडे लक्ष दिले पाहिजे, आधुनिक होत जाणारा ग्राहक वर्ग आणि युवा लक्षकेंद्री गटाकडे आपला मोर्चा वळविण्याची गरज आहे.

**ऑटोप्रेस इंडिया** 'च्या वतीने विविध प्रकारची स्टेनलेस-स्टील भांडी, फ्राइंग पॅन, प्रेशर कुकर, वोकचे विस्तृत प्रकार उपलब्ध करून देणारा अग्रेसर ब्रॅंड स्टाहल सादर केला आहे. ही भांडी सर्व साहित्य,नॉन-स्टीक कुकवेअर इत्यादीत उपलब्ध आहेत. **युनायटेड एकता, ओके इंडस्ट्रीज, नोल्ता, सेलो, एडब्ल्यूके, एसएनबी एंटरप्राईजेस** आणि **भानोबा एंटरप्राईजेस** अलीकडचे नॉन-स्टीक कुकवेअर आणि किचनवेअरचे प्रदर्शन भरवतील.


Stahl

# स्लिप टेक्नॉलॉजी | स्मॉल फर्निचर | स्मार्ट कुकिंग | स्वच्छ भारत

एचजीएच इंडियात हॉल १० मध्ये **स्मार्ट कुकिंग** पव्हेलियनची सुविधा करण्यात आली आहे, त्यात नवीन ग्राहकांच्या मागण्या लक्षात घेऊन भारतामधील कूकवेअर गटात होत असलेली प्रगती आणि दिशांचा वेध घेण्यात येईल.

## टेबलवेअर

सिरॅमिक्स, क्रॉकरी, ग्लासवेअर, कटलरी, सर्व्हवेअर, बारवेअर प्रकारात एचजीएच इंडिया नवीन उत्पादने, नवीन डिझाईन तसेच नव्या कल्पनांची विविधता घेऊन येईल. याठिकाणी भारतातून जयपूर, खुरजा मुंबई, दिल्ली, गुरुग्राम, कोलकाता आणि अन्य काही शहरे व नगरांतून प्रदर्शक सहभागी होणार आहेत.


Clay Craft

**क्ले क्राफ्ट** डिनरवेअर आणि सर्व्हवेअरमधील नाविन्यपूर्ण संग्रह सादर करणार आहे. त्याचे उद्दिष्ट भारतीय बाजारातील विस्तृत प्रकारच्या टेबलटॉप सिरॅमिकचे सादरीकरण करण्याचे आहे. "आमची आंतरराष्ट्रीय ब्रँडसोबतची नवीन भागीदारी सादर करताना उत्साह दाटून आला आहे. आंतरराष्ट्रीय ब्रँड 'मिस्टर मेन लिटल मिस" समवेत अन्य नवीन संग्रह कॉफी मगवरील हटके कॅरेक्टर्स, नवीन मोनोक्रोम संग्रह हॅपिनेस इज आणि सर्कस डिझायनर टेबलवेअर उपलब्ध करून देतील," असे कंपनीने सांगितले.

**कोरेल्ले,** च्या वतीने सुप्रसिद्ध आणि विश्वासार्ह ग्लासवेअर आणि डिशवेअर उत्पादनांच्या विस्तृत प्रकारचे विपणन करण्यात येईल. कोरेल्ले हे टेम्पर्ड ग्लास प्रोडक्ट असून त्यात तीन लेयरमध्ये लॅमिनेट ग्लासचा समावेश असेल. त्यांच्या डिझाईनमध्ये आधुनिक अमेरिकन आणि दक्षिणेकडील युरोपियन पसंतीचा, ढंगाचा प्रामुख्याने अ-पारंपरिक भारतीय घराचा प्रभाव दिसून येतो.

**रॉक्स,** हा कोलकाता-स्थित ब्रँड टेबलवेअर, ग्लासवेअर, स्टोरेज, बाटल्या, किचनवेअर आणि महत्त्वाची तसेच मोठी मार्केट सेगमेंट देऊ करतो.

**भारत पॉटरीज, स्टोन सफायर इंडिया, हितकारी** आणि **यु. पी. सिरॅमिक्स** बोन चायना आणि मेलामाईन टेबलवेअर, कूकवेअर, डिनरवेअर, स्टोरेज आयटम, बाटल्या आणि एअर प्युरिफायर इत्यादी सादर करतील.

## स्टोरेज आणि प्लास्टिक

एचजीएच इंडिया २०२१ मध्ये भेट द्यायला येणाऱ्यांकरिता वैविध्यपूर्ण डिझाईन आणि उत्पादनांची अपेक्षा असणार आहे. याठिकाणी काही अग्रगण्य मातब्बर झपाट्याने वाढणारे हाऊसवेअर सेगमेंट जसे स्टोरेज, प्लास्टीक, जनरल हाऊसवेअर आणि स्वच्छता आणि देखभाल उत्पादने सादर करतील.

**सेलो, सिग्नोरावेअर, जयपी'**कडून स्वयंपाकघर, साठवण, न्हाणीघर, स्वच्छता आणि सर्वसाधारण घरगुती वापराच्या उत्पादनांची विस्तृत उत्पादन श्रेणी उपलब्ध करून देण्यात येईल.

## ब्लिंड्स अँड विंडो डेकोर

अत्याधुनिक भारतीय होम्ससाठी ब्लिंड्स हा डेकोर आणि होम डिझाईनचा एक अविभाज्य घटक झाला आहे. एक श्रेणी म्हणून खिडकीच्या ब्लिंड्सचे विविध उपयोग आहेत. मुळात (1) बाहेरुन आत बघण्यास प्रतिबंध आणि (2) प्रकाशापासून संरक्षण अशी दोन कामे ते करतात. आणखी वेगळ्या प्रकारे ते सूर्यापासून आणि बाहेरच्या उष्णतेपासून संरक्षण देतात शिवाय बाहेरच्या थंडीपासून देखील ते सुरक्षा देऊ शकतात. ते आतून किंवा बाहेरून लावता येतात आणि त्यासाठी कागद, कापड, अल्युमिनियम, लाकूड आणि स्टील अशा वेगवेगळ्या साहित्याचा वापर केला जातो. सर्वसाधारणपणे, स्वयंचलितरीत्या उघड-झाप करता यावी यासाठी त्यात तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आलेला असतो. ब्लिंड्स त्यांचे सुरक्षा देण्याचे काम प्रभावीरित्या करत असल्याने, नियंत्रण पद्धतीशी संलग्न असल्याने आणि अतिशय सहजपणे स्वच्छ करता येत असल्याने गेल्या दोन दशकांपासून अत्याधुनिक होम्स, कार्यालय आणि हॉटेल्स इ. ठिकाणी पडद्यांना पर्याय म्हणून मोठ्या प्रमाणात ब्लिंड्सचा वापर केला जात आहे.

एकीकडे स्वयंचलन आणि डिझाईनमधील नाविन्यपूर्ण गोष्टींनी बाजाराचा ताबा घेतला आहे आणि दुसरीकडे, नव्याने बांधलेल्या खोल्यांच्या प्रकारांमध्ये ते बसवता येऊ शकतात. पारंपरिक किंवा विलासी डिझाईन पद्धतीपेक्षा अत्याधुनिक आणि कार्यात्मक डिझाईनमध्ये ब्लिंड्स अगदी उठून दिसतात. **मॅक्रोपोलो, व्हीएन्टो, कझाग, नोव्हा, टच ब्लिंड्स, मार्शल्स, ॲटको, आरटेक्स ओव्हरसीज** सारखे प्रस्थापित भारतीय ब्रॅन्ड्स हे व्हर्टीकल ब्लिंड्स, व्हेनेटीयन ब्लिंड्स, रोलर ब्लिंड्स आणि रोमन ब्लिंड्स अशी संपूर्ण श्रेणी सादर करतात. ते त्यांची ब्लिंड्समधील आणि पडदे सजविण्याची साधने, स्वयंचलन, पडदे आणि यंत्रणेमधील अत्याधुनिक श्रेणी देखील सादर करणार आहेत. भेटी देणार्या मंडळींना या आधुनिक उत्पादन समूहाच्या व्यावसायिक क्षमतेचा फायदा घेण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा आणि ट्रेंड्सचा शोध घेता येईल.

## वॉल पेपरना वाढती मागणी

येत्या काही वर्षात भारतीय वॉलपेपर्सच्या बाजारात दर वर्षी 30-40 टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे, असे बाजार तज्ज्ञांचे मत आहे. वाढती शहरी लोकसंख्या, बदलते राहणीमान आणि क्रय शक्तीमध्ये झालेल्या वाढीमुळे चांगल्या डिझाईनला प्राधान्य देण्याची तयारी ही यामागची प्रेरणा आहे. वॉलपेपर्सची बाजारातील मागणी वाढणार आहे आणि विविध वैशिष्ट्ये, गुणवत्ता आणि वैविध्यपूर्ण किमती यामुळे या साहित्यातील वैविध्याचा विकास झाला आहे. एचजीएच इंडियातर्फे **मार्शल्स वॉलकव्हरिंग, एशियन पेंट्स आणि ॲटको इंटेरिअर्स** या बाजारातील आघाडीच्या कंपन्या सादर केल्या जातील. रॉयल वॉलपेपरतर्फे **एरिसमन** हा जर्मन ब्रँड आणला जाईल. **ताहेरी डेकोर,** नक्षीदार काचेच्या फिल्म्स आणि वॉल एम्पायरमधील तज्ज्ञ, सानुकुलीत वॉलपेपरमधील विशेषज्ञ देखील त्यांच्या नव्या उत्पादनांचे प्रदर्शन करतील. या खेरीज, इतर अनेक वॉलपेपर आयातदार आणि राष्ट्रीय वितरक देखील त्यांच्या वॉलपेपर्सची आंतरराष्ट्रीय श्रेणी सादर करतील.


Erismann

**मार्शल्स वॉलकव्हरिंग** हे भारतातील सर्वात महत्त्वाचे वॉलपेपर्स तज्ज्ञ आहेत. एचजीएच इंडिया 2021 मध्ये त्यांनी युरोपिअन डिझाईन्सवर भर देऊन डिझाईन्स आणि साहित्याची विस्तृत श्रेणी सादर केली आहे. मार्शल्स हे ग्रॅंडको, रॅश, सिर्पी, झांबेटी, ओमेक्सो, मारबर्ग आणि कॅसडेको या युरोप आणि युएसएतील सर्वोत्तम कंपन्यांकडून वॉलकव्हरिंग्ज आणणारे विशेष आयातदार आहेत.

## कार्पेट्स आणि फ्लोअरकव्हरिंग्ज या उदयोन्मुख श्रेणी

होम्स सुधारण्याचा आणि नवीन होम्स, कार्यालये, दुकाने इ. शोभिवंत करण्याच्या ट्रेंडमुळे कार्पेट्स आणि इतर फ्लोअर कव्हरिंगजना मोठा फायदा होत आहे. देशांतर्गत होम प्रॉडक्ट्स बाजारात एक महत्त्वाची श्रेणी म्हणून त्यात वाढ होत आहे. एरिया रग्ज आणि कार्पेट्स हे केवळ शोभा वाढवत नाहीत तर लक्षणीय स्वरुपात खोलीतील आवाज आणि थंडावा कमी करण्याचे देखील काम करतात. भारतातील मूल्य-केंद्रित ग्राहकांच्या बरोबरीने हा बाजार लग्झरी ते प्रीमिअम, शोभिवंत ते कार्यक्षम आणि आधुनिक ते पारंपरिक अशा फ्लोअर कव्हरिंग्जच्या सर्वच विभागात मोठी वाढ अनुभवत आहे. नैसर्गिक आणि सिंथेटीक रग्ज आणि फ्लोअर कव्हरिंग्जच्या मागणीत मोठी वाढ होताना दिसत आहे.


CEPC

भारतातील हाताने तयार करण्यात आलेल्या कार्पेट्सचा जागतिक बाजारात 40% पेक्षा जास्त वाटा असल्याने त्याचे योगदान सर्वाधिक महत्त्वाचे आहे. आधुनिक आवडीनुसार बदलण्यात येत असणारी कुशल हस्तकला आणि पारंपरिक सजावट यामुळे त्यांची प्रशंसा केली जाते. भारतीय उत्पादकांसाठी निर्यात ही अतिशय महत्त्वाची असली तरी अनेक जण झपाट्याने वाढत असलेल्या देशांतर्गत बाजारावरही लक्ष ठेवून आहेत. हातांनी गाठी मारून, हातांनी गुंडाळ्या करून आणि हाताने विणून तसेच यंत्राने तयार करण्यात आलेले निवडक एरिया रग्ज आणि कार्पेट्स एचजीएच इंडियामध्ये बघायला मिळू शकतील. **कालीन, व्हिलेज विवर्स, व्हाईट आईज, नारायण कार्पेट्स अशी अग्रणी नावे त्यांची सर्वसमावेशक श्रेणी सादर करतील. गेल्या वर्षीप्रमाणेच, कार्पेट एक्स्पोर्ट प्रमोशन काउन्सिल (सीईपीसी)** भादोही, वाराणसी, जयपूर, बिकानेर, आग्रा आणि दिल्ली इ. अग्रणी उत्पादक ठिकाणांहून हातांनी तयार करण्यात आलेल्या कार्पेट्सच्या आघाडीच्या 20 उत्पादकांचा आणि निर्यातदारांचा समूह घेऊन येणार आहे.

कालीन, रग्ज कन्स्प्टे, सुपरग्रास असे इतर अग्रणी उत्पादक, आयातदार आणि निर्यातदार देखील त्यांच्याकडील वस्तू सादर करतील. उदाहरणार्थ, हातांनी गाठी मारुन तयार करण्यात आलेल्या कार्पेट्सचे तज्ज्ञ असणारे रग्ज ओव्हरसीज केवळ पारंपारिक डिझाईन्सच नव्हे तर 'टर्कीश कार्पेट' ही त्याची नवी श्रेणी आणि आधुनिक डिझाईनपासून प्रेरणा घेऊन तयार करण्यात आलेले 'ॲबस्ट्रॅक्ट' तसेच 'मॉडर्न आर्ट' हा त्यांचा संग्रह सादर करतील.

यंत्रांनी तयार करण्यात आलेल्या कार्पेट्सचा देशांतर्गत ब्रॉडलूम उत्पादक म्हणून कालीन लाईफस्टाईलचा नावलौकिक आहे. भारतीय कार्पेट उत्पादन उद्योगात त्यांची स्थिती सर्वोत्तम आहे. यंत्रांनी तयार करण्यात आलेल्या कार्पेट्सच्या जोडीने ते दर्जेदार गुणवत्तेचे हातांनी तयार करण्यात आलेले रग्ज सादर करतात आणि कार्पेट्स तसेच फ्लोअरकव्हरिंग्जना गुणवत्तापूर्ण जीवनशैलीचा एक भाग म्हणून सादर करतात.

# ट्रेंड्स 2021/22 | स्त्रोत | नवीन व्यवसाय | संधी

कॉयर बोर्ड आणि नॅशनल ज्यूट बोर्डातर्फे सामूहिक सहभागाचे आयोजन करण्यात आले आहे.

कॉयर आणि ज्यूट क्षेत्रातील उत्पादक त्यांच्या सदस्यांच्या सोबतीने अनुक्रमे, कॉयर डोअर मॅट्स, ज्यूट आणि ज्यूटचा वापर करून तयार करण्यात आलेली कार्पेट्स, फ्लोअरिंग, खरेदी आणि फॅशन बॅग्ज तसेच शोभिवंत साहित्य सादर करतील.

## होम डेकोर विस्तारत आहे

वॉलपेपर्स आणि वॉल डेकोर ते फरशी, टेबल्स, भिंती आणि



सिलिंगसाठी वैविध्यपूर्ण शोभिवंत साधने तसेच कॅण्डल स्टँड्स, शोभिवंत मेणबत्त्या, सुगंधी पदार्थ, पॉपोरी, कृत्रिम फुले आणि गवत, मूर्ती, फुलदाण्या, फोटोफ्रेम्स, आर्टवर्क, कलाकृती, भित्तीचित्र इ सह एचजीएच इंडिया दिल्ली, मुंबई, मुरादाबाद, फिरोजाबाद, आग्रा, सहारनपूर, लखनऊ, जयपूर, जोधपूर, काश्मीर, राजकोट, हैदराबाद या भारतातील अग्रणी हस्तकला केंद्रांमधील विस्तृत श्रेणी सादर करेल.

मुरादाबादमधील **पॅरामाऊंट**तर्फे भारतातील किरकोळ विक्रेत्यांसाठी देखील धातूच्या आणि पितळीच्या, काचेच्या वस्तूंची सर्वात नवी आंतरराष्ट्रीय शोभिवंत साहित्याची विस्तृत श्रेणी सादर केली जाणार आहे.

रांची येथील **वेदाज** देखील नेहमीप्रमाणेच, पुन्हा एकदा वैशिष्ट्यपूर्ण आणि स्मॉल फर्निचर, वॉल डेकोर आणि शोभिवंत साहित्याची अतिशय नाविन्यपूर्ण श्रेणी घेऊन येणार आहे.

**ईपीसीएच (एक्स्पोर्ट प्रमोशन काउन्सिल फॉर हँडीक्राफ्ट्स)** ने त्यांच्या अनेक सदस्यांसाठी सामुहिक सहभागाचे आयोजन केले आहे. त्यांच्यासाठी हस्तकलेची आणि शोभिवंत वस्तूंची विस्तृत श्रेणी सादर केली जाईल.

गव्हर्नमेन्ट ऑफ इंडिया वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या डेव्हलपमेंट कमिशनर हँडीक्राफ्ट्सने दिलेल्या मोठ्या पाठींब्याव्यतिरिक्त, युपीईए, छत्तीसगड हस्त शिल्प विकास बोर्ड, एनईसीटीएआर आणि हँडलूम आणि हँडीक्राफ्ट्स संचालनालय, काश्मीरसारख्या संस्था या **इंडियन हेरीटेज** कला आणि हस्तकलेतील छुपा खजिना किरकोळ विक्रेत्यांसाठी मूळ ठिकाणांहून घेऊन येतील. हॉल 10 मधील एस पव्हीलियनमध्ये एचजीएच इंडियातर्फे प्रायोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनात, शोभिवंत आणि घरातील उत्पादनांच्या वैविध्यपूर्ण वापरासाठी लाकडावरील कोरीव काम, धातूवरील खोदकाम, मातीची भांडी, कशिदाकारी आणि अशा अनेक क्षेत्रातील राष्ट्रीय पुरस्कार विजेत्यांनी तयार केलेल्या राजेशाही भारतीय कला आणि हस्तकला याचे प्रदर्शन मांडले जाईल.

## स्मॉल आणि वैशिष्ट्यपूर्ण फर्निचर

स्मॉल फर्निचर या नव्याने विकसित होणार्या श्रेणीवर एचजीएच इंडिया 2021 ने लक्ष केंद्रित केले आहे. कार्यालय आणि होममधील मिश्र कलाकृतींचे मॉडेल ही एक दीर्घकालीन घटना म्हणून विकसित झाली असून भारतभरात तिला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या खेरीज, शहरांमधील राहत्या जागा अतिशय महाग होत आहेत. त्यामुळे होम्समध्ये देखील कमी जागा मिळत असल्याने जागेची बचत करणारे आणि छोटे फर्निचर असणे गरजेचे झाले आहे. दुसरीकडे, खोल्या आकर्षक दिसल्या पाहिजेत. त्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण म्हणजेच ॲक्सेन्ट फर्निचरकडे



आता लोकांचे लक्ष वेधले गेले आहे. संपूर्ण खोलीला त्यामुळे एक उठाव येतो.

**एशियन पेंट्स, कर्ल-ऑन, वेदाज** सारखे अग्रणी ब्रँड पहिल्यांदाच या श्रेणीतील त्यांची गुपिते व्यवसायासाठी उघड करणार आहेत. किरकोळ विक्रेत्यांसाठी आणि वितरकांसाठी त्यांच्या सध्याच्या व्यवसायाला पूरक असणार्या विविध नव्या व्यवसाय संधी चालून येणार आहेत. **एनईसीटीएआर** नव्या सोर्सिंग संधी उघडणार आहेत. **भारतातील ईशान्येकडील** अतिशय कुशल अशा उत्पादकांकडून बांबू आणि बांबूचे फर्निचर, शोभिवंत साहित्य आणि घरासाठी लागणार्या वस्तू ते घेऊन येणार आहेत.

देशांमधील प्रवास निर्बंध आणि लॉकडाऊन यामुळे अडथळे निर्माण झाले असताना देखील सहा इटालीयन कंपन्या त्यांची फर्निचर श्रेणी सदर करणार आहेत. नवी दिल्ली येथे इटालियन ट्रेड कमिशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या कॅटलॉग शोच्या माध्यमातून हे प्रदर्शन करण्यात येणार आहे. याचप्रकारे, मलेशियन टिंबर काउन्सिल (एमटीसी) देखील मलेशियन फर्निचर निर्यातदारांसाठी कॅटलॉग शो सादर करेल आणि एचजीएच इंडियामधील त्यांच्या बूथच्या माध्यमातून भारतीय आयातदारांना ते सर्व माहिती देतील. एचजीएच इंडियाच्या पुढील प्रदर्शात यात वाढ होण्याची शक्यता आहे.

## PHOTO SPOT

## छायाचित्र केंद्र

### तुमच्या उत्पादनांकरिता व्यावसायिक छायाचित्रण

मनमोहक, वास्तविक छायाचित्रण हा कोणत्याही होम उत्पादनाकरिता सुस्थापित सादरीकरणाचा महत्त्वपूर्ण पैलू आहे – मग ते बेड अथवा बाथ लिनन असो किंवा सजावटीचे साहित्य, फर्निशिंग फॅब्रिक, ब्लिंड, सजावटीच्या वस्तू, वॉलपेपर, गालिचे किंवा किचनवेअर, कुकवेअर, स्वयंपाकघरातील उपकरणांचे अनेक पैलू, सिरॅमिक आणि मातीची भांडी किंवा सर्वसाधारण हाऊसवेअरचा समावेश राहील.

सुंदर, लक्षवेधी छायाचित्रे म्हणजे ब्रँड, निर्माता किंवा विक्रेत्याच्या कोणत्याही चांगल्या सादरीकरणाचे केंद्रस्थान असते. आजच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत बाजारात तुमच्या उत्पादनाची योग्य ओळख निर्माण करून द्यायची झाल्यास ती पहिली महत्त्वाची पायरी समजली जाते.



एचजीएच इंडिया २०२१ चे प्रदर्शक आणि भेट द्यायला येणाऱ्यांत चांगल्या छायाचित्रणाने वेगळेपणाची बाजू दिसावी, त्यांच्या उत्पादनांचे मार्केटींग आणि दृश्य सादरीकरण व्हावे, त्यांचा ब्रँड खरेदी इच्छुकांमध्ये किंवा राष्ट्रीय पातळीवर लोकप्रिय व्हावा अथवा मार्केटमध्ये नेतृत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने छायाचित्रांची मदत होते. एचजीएच इंडियाच्या वतीने सुप्रसिद्ध छायाचित्रकार शिराज चांद यांच्याद्वारे “फोटो स्टॉप” शीर्षकाखाली अभिनव प्रकल्प घेण्यात आला.

हॉल १५ मध्ये ट्रेंड्स पव्हेलियन जवळ, एचजीएच इंडिया आणि फोटोग्राफिक्सच्या वतीने संयुक्तपणे फोटोग्राफी स्टुडीओ उभारण्यात आला, त्यात लिव्हिंगरूम, बेडरूम, किचन आणि बाथरूम अशा वेगवेगळ्या लाइफस्टाइल देण्यात आल्या.

भेट द्यायला येणारे आणि प्रदर्शक यांना स्वत:ची उत्पादने या स्टुडिओत नेता येतील, पहिल्यांदा येणाऱ्यांना अगोदर अपॉइंटमेंट घेऊन प्राधान्याने सेवेचा लाभ घेता येईल. त्यांना पहिले छायाचित्र कोणत्याही शुल्काशिवाय काढून घेण्याची मुभा राहील. या छायाचित्राचा वापर त्यांना कोणत्याही प्रचार किंवा व्यावसायिक कारणास्तव करता येईल. चांगले छायाचित्रण दृश्य सादरीकरण आणि विपणन प्रयत्नांना साह्य करते हे जाणून घ्यायला हा उपक्रम मदतीचा ठरणार आहे.

“फोटो स्टॉप” मध्ये आपल्या कारकिर्दीत शिराज चांद यांनी होम प्रोडक्ट्चे जे व्यावसायिक छायाचित्रण केले आहे, त्याचा डिस्प्ले पाहण्याची संधी मिळेल. ही छायाचित्रे पाहणे म्हणजे नजरेला मेजवानी असेल, शिवाय दृश्य प्रचार-प्रसाराच्या प्रयत्नाने इथे भेट द्यायला येणाऱ्यांना चांगल्या छायाचित्रांचे महत्त्व समजून घेता येईल आणि प्रशंसादेखील होईल.

होम इंडस्ट्रीचे विपणन करण्यात एचजीएच इंडियाद्वारे जे प्रयत्न करण्यात येत आहेत, हा उपक्रम त्याचाच एक भाग आहे. ज्यामुळे विक्रेते आणि लहान ब्रँड्सकडून उत्पादनाच्या व्यावसायिक सादरीकरणाला चालना मिळेल.

**क्यूआर कोड स्कॅन करून एचजीएच इंडिया व्हिडीओ पहा**

HGH INDIA 2021 10
HOME DECOR · GIFTS · HOUSEWARE

**व्यापाराला भेट देणाऱ्यांनो!**
ऑनलाईन नोंदणी करा
**20 नोव्हेंबर, 2021**
www.hghindia.com वर आणि
**₹1,000/-*** प्रवेश शुल्काची **बचत** करा

*जर तुम्हाला 20 नोव्हेंबर, 2021 पर्यंत मोफत पूर्व-नोंदणी करण्यात असमर्थ ठरलात, तरीही तुम्हाला एचजीएच इंडिया 2021 ला भेट देता येईल रु. 1000/- देऊन प्रदर्शनाच्या ठिकाणी तत्क्षणी-नोंदणी शक्य आहे प्रवेश शुल्क (जीएसटीसह).

**कृपया मदतीकरिता संपर्क साधा**
अमर शर्मा: +91 99 676 00286
ईमेल: visitors@hghindia.com
मुंबई: दूरध्वनी: +91 (22) 2421 4111
दिल्ली: दूरध्वनी: +91 (11) 2571 4111
www.hghindia.com